## नियमित दिवाणी दावा क्रमांक ४४६/२०२४ मधील नि.क्र.३२ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी प्रतिवादी क्र. ७ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दिला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ७ सुलोचना शंकर पवार यांचा मृत्यु दिनांक २८.०२.२०२५ रोजी झाला आहे व त्यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. सबब प्रतिवादी क्र. ७ चे वारसांचे नावे प्रतिवादी म्हणून सामील करावे.

२. प्रस्तुतचे अर्जास प्रतिवादी यांनी हरकत नोंदविली.

३. प्रतिपक्षांच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार प्रतिवादी क्र. ७ चे वारस दाव्यात दुरुस्तीने अभिलेखावर घेण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मी मां सा

४. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने दावा वाटप होऊन कब्जा मिळण्यासाठी, अतिक्रमण काढून मिळणेकरिता व निरंतर ताकीदिसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ७ सुलोचना शंकर पवार यांचा मृत्यु दिनांक २८.०२.२०२५ रोजी झाला आहे व त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही अगर दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज नि. ३२ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ७ चे वारस सदर दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून अभिलेखावर घेण्यात येत आहे. सदर दुरुस्ती ही आजपासून १४ दिवसाचे आत करावयाची आहे.

३. वादीने योग्य त्या दुरुस्तीसह दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.07.08 17:56:24 +0530

( व्ही. बी. घाडगे )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
वडूज.

दिनांकः- ०८.०७.२०२५